# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २१/०७/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत २ कि. मी. अंतरावरील वंडली शिवार काटोल येथे दि. १६/०७/२०२२ चे १८.०० वा. ते १९/०७/२०२२ चे १४.०० दरम्यान संशईत आरोपी नामे— उज्वल वाणी रा. फेटरी ता. काटोल याने फिर्यादीचे विटाभट्टी वर असलेल १) ट्रॅक्टरचे चाकाचे के जी व्हिल किमंती ७,०००/—रू. २) १६ मिमि वाल्या लोखंडी बार १५ ते २० फुट लांबीचे ३ बार किमंती २,०००/—रू., ३) ०३ नग लोखंडी पाईप ०८ फुट लांबीचे किमंती २,०००/—रू., ४) तर वेस्टेज लोहालंगर किमंती ५००/—रू. असा एकुण कि. ११,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी फिर्यादी नामे— राजेश दिलीपराव वैदया, वय ३४ वर्ष, रा. वंडली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल मो.नं. ७४९८६५७९६३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत अर्धा कि.मी. अंतरावरील श्री ज्वेलर्स शॉप बाजार चौक कळमेश्वर येथे दि. १७/०७/२०२२ चे १४.०० वा. दरम्यान आरोपी नामे— अमोल रवि नलके वय २९ वर्षे रा प्लॉट नं. ३०३ विहार अपार्टमेंट, समता नगर रोड, सुगत नगर रोड, उप्पलवाडी नागपूर हा फिर्यादी नामे— श्री. देवेन्द्र बाबुरावजी भोरकर वय ५४ वर्षे रा. प्लॉट क. २८ एच.आय.जी.कॉलनी पोलीस स्टेशन समोर कळमेश्वर यांचे ज्वेलरी दुकानात गोप घेण्याकरीता आला. त्याने गोप खरेदी न करता अंगठी मागितली असता आंगठी दाखविली असता त्याने खरेदी न करता फिर्यादीची नजर चुकवून एक सोन्याची आंगठी ४ ग्रॅम अंदाजे कि २१,०००/— ची चोरून नेली होती. सदर आरोपी पुन्हा दि. १९/०७/२०२२ रोजी दुकानात आला असता तोच आरोपी मिळून आल्याने त्यास पकडून पोस्टे. कळमेश्वर ला आणून सादर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री खडसे मो.नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

## जबर दुखापत

**१) पो.स्टे. भिवापुर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सुसंद्री येथे दिनांक १९/०७/२०२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. मंजुशा दिलीप मेंढे वय ४० वर्ष रा. सुसंद्री ता. भिवापुर जि.नागपुर यांचा आरोपी क्र. ०१ स्वप्निल दिलीप मेंढे हा मुलगा असुन आरोपी क्र. ०२. सुशमा गुड्डू मेंढे ही सावत्र सुन असुन सध्या ती एकटीच आपल्या एक मुलगीसह फिर्यादीचा घराशेजारी राहते. आरोपी क्र ०२ सुशमा हीने फिर्यादीला दोन महीने झाले ईलेक्ट्रीक बील भरण्याकरीता पैसे दिले नाही. दि. १९/७/२२ रोजी रात्री ०८.३० वा. च्या सुमारास आरोपी क्र ०१ हा फिर्यादीला महणाला की, 'तु सुशमा मेंढे हीला जेवण का नाही देत' तेव्हा फिर्यादीने त्यास म्हटले की, 'ती माझी कोण लागते, तिला मी कशाला जेवण देवु, ती येथे राहत असता ईलेक्ट्रीक बील भरत नाही' असे म्हटले असता आरोपी क्र. ०२ ही फिर्यादी जवळ काडी घेवुन मारण्याकरीता आली व शिवीगाळ करू लागली. तेव्हा आरोपी क्र ०१ याने फिर्यादीला शिवीगाळ करून आरोपी क्र. ०२ हीच्या हातातील काडी आपल्या हातात घेवुन फिर्यादीच्या डाव्या मांडीवर तसेच डाव्या हाताला मारले. फिर्यादीचे पती मध्यस्थी येवुन त्याच्या हातातील काडी हिसकली तेव्हा आरोपी क्र ०१ याने घरात जावुन लोखंडी सलाख आणुन फिर्यादीच्या पती नामे– दिलीप मेंढे वय ४५ वर्ष रा. सुसंद्री ता. भिवापुर जि.नागपुर यांना शिवीगाळ करून लोखंडी सळाखीने डोक्यावर तसेच डाव्या हातावर मारून जखमी केले. त्यामुळे पतीच्या डोक्याला सलाखीचा मार लागल्याने रक्त निघाले आहे. तसेच आरोपीने फिर्यादीला व फिर्यादीचा पतीला मारण्याची धमकी दिली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रकाश चनगोले मो.न. ९८२३३८०८१५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा तामसवाडी येथे दिनांक २०/०७/२०२२ चे १२. ०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. स्वाती सुशिल मांगुळकर, वय ३० वर्ष, रा. तामसवाडी हिचा पती आरोपी नामे– सुशिल क्रिष्णाजी मांगुळकर, रा. तामसवाडी हा घरी दारू पिवुन आला व 'मी गहाण ठेवलेली मोटार सायकल सोडवीण्याकरीता मला पैसे दे, तु शेती विकली आहे, तुझ्याकडे पैसे आहे.' तेव्हा फिर्यादीने आरोपीला म्हटले की, 'माझ्याकडे पैसे नाही.' असे म्हटले असता आरोपीने फिर्यादी सोबत तोंडातोंडी वाद करूण हातबक्कीने दोन्ही डोळयावर मारूण जबर दुखापत केले व शिवीगाळ करूण मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो. हवा. हरीष सोनभद्रे, मो. नं. ९५२७६६६९२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**